# सातारा पोलीस दल - प्रेस नोट

(सायबर पोलीस ठाणे यांची विशेष कामगिरी)

**प्रेसनोट दिनांक: ०१/१०/२०२६ | विषय: CIER पोर्टलच्या माध्यमातून हरवलेले व चोरीस गेलेले ४४९ मोबाईल हँडसेटचे वाटप.**

**मा.श्री.रंजनकुमार शर्मा, विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र कोल्हापूर** यांची दिनांक २८/०९/२०२६ ते दिनांक ०१/१०/२०२६ या कालावधीमध्ये सातारा जिल्हा पोलीस दलाची वार्षिक निरीक्षण तपासणी सुरू आहे. दरम्यान व तत्पूर्वीच्या कालावधीमध्ये सातारा जिल्हा पोलीस दलाच्या कार्यक्षेत्रातील सायबर पोलीस ठाणे आणि जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांमार्फत हरवलेले, चोरीस गेलेले तसेच गहाळ झालेले मोबाईल फोन शोधून परत मिळविण्याची विशेष मोहीम राबवण्यात आली.

सदर मोहिमेदरम्यान भारत सरकारच्या **Central Equipment Identity Register (CEIR)** पोर्टलचा प्रभावी वापर करण्यात आला आहे. विविध पोलीस ठाण्यांमध्ये दाखल झालेल्या हरवलेल्या व चोरीस गेलेल्या मोबाईल फोनच्या IMEI क्रमांकाच्या आधारे तांत्रिक तपासणी करून शोध घेण्यात आला. सन २०२४ ते सप्टेंबर २०२६ या कालावधीत एकूण १४,३०० तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. या तक्रारींमधील विविध ठिकाणी वापरले जाणारे मोबाईल फोन हस्तगत करण्यात आले असून, त्यापैकी ४,८४२ मोबाईल फोन नागरिकांना परत करण्यात आले आहेत. तसेच, आज रोजी सुमारे दीड कोटी रुपये किंमत असलेले एकूण ४४९ मोबाईल हँडसेट कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून सायबर पोलीस ठाणे व जिल्ह्यातील इतर पोलीस ठाणे यांनी हस्तगत केले आहेत.

### मोबाईल वाटप सोहळा

हस्तगत करण्यात आलेले मोबाईल हँडसेट दिनांक ०१/०१/२०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमामध्ये मा.श्री.रंजनकुमार शर्मा, विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र कोल्हापूर यांच्या हस्ते संबंधित मोबाईल धारकांना सुपूर्द करण्यात आले आहेत. त्यावेळी सदर कार्यक्रमास श्री. निखिल पिंगळे, पोलीस अधीक्षक, सातारा, श्रीमती डॉ. वैशाली कडुकर, अपर पोलीस अधीक्षक, सातारा तसेच इतर पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार हजर होते.

नागरिकांचे हरवलेले व चोरीस गेलेले मोबाईल फोन शोधून परत मिळविण्याची ही मोहीम मा. श्री. निखिल पिंगळे, पोलीस अधीक्षक, सातारा व मा. डॉ. वैशाली कडुकर, अपर पोलीस अधीक्षक, सातारा यांच्या मार्गदर्शनाखाली, सायबर पोलीस ठाणे आणि जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांमधील पोलीस अंमलदारांच्या अहोरात्र प्रयत्नांमुळे यशस्वीरीत्या पार पडली आहे.

सातारा जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाणे व सायबर पोलीस ठाण्यातील अधिकारी व अंमलदार यांनी CEIR पोर्टलचा प्रभावी वापर करून केलेल्या तांत्रिक तपासामुळे नागरिकांचे हरवलेले व चोरीस गेलेले फोन मोठ्या प्रमाणात हस्तगत करण्यात यश आले आहे. या प्रभावी कारवाईमुळे नागरिकांना त्यांच्या मौल्यवान मोबाईल फोनचा परतावा मिळाला असून, मोबाईल चोरी व हरवलेल्या मोबाईलच्या गैरवापरात प्रतिबंध करण्यासही मोठी मदत झाली आहे.

## कारवाईत सहभाग व अभिनंदन

मा.श्री.रंजनकुमार शर्मा, विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र कोल्हापूर, श्री. निखिल पिंगळे, पोलीस अधीक्षक, सातारा व श्रीमती डॉ. वैशाली कडुकर, अपर पोलीस अधीक्षक, सातारा यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. विश्वजीत घोडके (स्था.गु.शा. शाखा, सातारा), पोलीस निरीक्षक श्री. उत्तम भापकर (सायबर पोलीस ठाणे, सातारा), सहायक पोलीस निरीक्षक श्री. राजेश माळी (सायबर पोलीस ठाणे, सातारा) तसेच पोलीस अंमलदार प्रशांत मोरे, ओंकार डुबळ, संदीप पाटील, राकेश घाडगे, रामदास भास्करवाड, स्वप्नील शिंदे, किरण जगताप आणि प्रवीण फडतरे यांनी सदरची कारवाई केली आहे. उत्कृष्ट कामगिरीबद्दल या सर्व अधिकारी व अंमलदारांचे वरील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.